MAH/MUL/03051/201
ISSN-2319 931

Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue, **June 2019**

Prof. Dr.Bharati Revadkar

vidyawarta™

International Multilingual Research Journal

Special Issue

Edited By :- **Prof. Dr. Bharati Revadkar**

ISSN :- 2319 9318

- **Publisher :**
  Harshwardhan Publication Pvt.Ltd.
  Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
  Pin-431126, vidyawarta@gmail.com

- **Printed by :**
  Harshwardhan Publication Pvt.Ltd.
  Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
  www.vidyawarta.com

- **Page design & Cover :**
  Shaikh Jahuroddin,Parli-V

- **Edition: June 2019**

IMPACT FACTOR
5.234

Regd. No. 261600

Note : The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board of Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra India)

http://www.printingarea.blogspot.com

❑ CONTENTS ❑

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

Sr. No.	Title/Author	Page No.
1.	गौरी देशपांडेचे लेखन : एक चिंतन **प्रा. डॉ. भारती रेवडकर**	6
2.	आदिवासी स्त्री लेखिकांचे साहित्य **प्रा. डॉ. माहेश्वरी गावित**	10
3.	स्त्री विकासाचा पाया स्त्री शिक्षण **प्रा. पोर्णिमा शिरीश कोल्हे**	16
4.	परंपराधिष्ठित नव स्त्रीजीवन शैलीचा 'मारवा' **डॉ. सुवर्णा गुंड - चव्हाण**	19
5.	महिला सक्षमीकरणाच्या दिशा **डॉ. नवनाथ दणाणे**	25
6.	बहिणाबाईंच्या कवितेतील स्त्री जीवनाचा उत्कट आविष्कार **डॉ. विशाल प्रकाश लिंगायत**	27
7.	"स्त्रीवाद प्रेरणा, स्वरुप व संकल्पना आणि मराठीतील स्त्रीवादी साहित्य" **डॉ. बाळासाहेब दास**	30
8.	वैदिक कालखंडातील स्त्री जीवन **प्रा. शुभदा शिवपूजे-उपासे**	36
9.	स्त्रीवादी संकल्पना आणि स्वरुप **प्रा. डॉ. सुनिता सुर्यवंशी**	38
10.	भारतीय राजकारणातील स्त्री-प्रतिनीधीत्व **प्रा. बावगे एस. जे.**	41

05

महिला सक्षमीकरणाच्या दिशा

डॉ. नवनाथ दणाणे
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

महिला सक्षमीकरण पार्श्वभूमी

८ मार्च १८५७ साली कामाचे तास कमी करावे कामाच्या ठिकाणी स्त्रियांना सुरक्षितता द्यावी, समान काम समान वेतन मिळावे, स्त्रियांनाही मतदानाचा हक्क मिळावा, अशा मागण्या घेऊन जर्मनीमध्ये महिलांचा मोर्चा निघाला होता. महिलांनी आपल्या न्याय , हक्कासाठी सुसंघटीतपणे काढलेला हा पहिलाच मोर्चा होता. जर्मनीच्या साम्यवादी महिला नेत्या क्लारा झेटकीन यांनी त्या मोर्चाचे स्मरण म्हणून अर्थातच स्त्री हक्काचे स्मरण करुन देणारा दिवस म्हणून ८ मार्च हा दिवस 'महिला दिन' म्हणून साजरा करावा अशी सूचना केली. तेव्हापासून ८ मार्च हा दिवस महिला दिन म्हणून साजरा केला जातो.

यूनोने १९७५ हे साल आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्ती वर्ष म्हणून घोषित केले. तेव्हापासून स्त्रीमुक्ती चळवळीला जागतिक परिप्रेक्षात मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचा विचार रुढ झाला. आंतरराट्रीय स्त्रीमुक्ती वर्षामुळे स्त्रीमुक्ती विचारांची जागृती वाढली. पुढे भारतीय स्त्री चळवळीचा पाश्चात्य स्त्री चळवळींच्या विचारांशी सपंर्क निर्माण झाला.

भारतामध्ये स्त्रीमुक्ती कार्याचा प्रारंभ इंग्रज राजवटीमध्ये झाला. भारतातील अनेक प्रकारच्या अमानवी रुढी, परंपरा बंद करण्यासाठी इंग्रज राजवट उपयुक्त ठरली. राजा राममोहन रॉय, म. फुले, सावित्रीबाई फुले, आगरकर, महर्षी कर्वे यांच्या सामाजिक कार्यालाही ही राजवट हातभार लावणारी ठरली. फुले दांपत्याने १८४८ साली पुणे येथे भिडे वाडयात मुलीची पहिली शाळा सुरु केली. स्त्रीमुक्तीच्या व आत्मसन्मानाच्या कार्याला गती प्राप्त झाली. पुढे स्वातंत्र्योतर कालखंडामध्ये शिक्षणाचा प्रसार झपाटयाने झाला. स्त्रीमुक्ती चळवळीला नवीन परिमाण प्राप्त झाले. स्त्रीमुक्ती चळवळीने आक्रमक पवित्रा घेतला. त्यातूनच पुढे स्त्रीवाद ही संकल्पना रुढ झाली. स्त्रीवादी चळवळ स्त्री आत्मसन्मानाची चळवळ बनली. समतामूलक समाजाची प्रतिष्टापना हे या चळवळीचे ध्येय धोरणे बनली.

भारतीय स्त्रीवादी चळवळीवर प्रामुख्याने ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, म. फुले सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्याचा प्रभाव दिसतो. १९६० नंतर स्त्रीवादी विचाराला गती प्राप्त झाली. स्त्रीयांना स्वत:ची आत्मवंचना लक्षात येत गेली. स्त्रीवादी चहवळीतील लेखिका, विचारवंत कार्यकर्त्यांनी स्त्रीयांच्या आत्मवंचनेला कारणीभूत ठरणाच्या घटकांविषयी आवाज उर्ठविण्यास सुरुवात केली. छाया दातार, विद्याबाळ, विद्युत भागवत यांसारख्या लेखिकेच्या लेखनाचा या संदर्भात विचार करता येईल.

महिला स्त्री सक्षमीकरणासाठी आवश्यक बाबी :-

महिला सक्षमीकरणा संदर्भात आजच्या स्त्रीचा करतांना पुढील काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१. आजच्या स्त्रीयांचा आर्थिक विकास काय आहे ?
२. आजच्या स्त्रीचे सामाजिक व कौटुंबिक स्थान काय आहे ?
३. आजच्या स्त्रीयांचा राजकीय सहभाग किती आहे ?
४. सामाजिक व राजकीय नेतृत्त्व देऊन त्यांना विकासाच्या प्रक्रियेत आणता येईल का ?
५. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रीचा सहभाग किती महत्त्वाचा ठरु शकतो ?
६. एकंदरीत राष्ट्र बांधणीच्या कामामध्ये स्त्रीचे योगदान या सर्वांचा विचार करणे आवश्यक आहे.

वरील सर्व क्षेत्रातील योगदानासाठी आजच्या स्त्रीने स्वत:मध्ये पुढील काही जीवनमूल्ये आत्मसात केली पाहिजेत.

१. निर्भयता :-

स्त्रीयांनी निर्भय बनले पाहिजे. म्हणजे आपले संरक्षण किंवा उपजिविका कोणीतरी पुरुषानी केली पाहिजे, ही मानसिकता बदलली पाहिजे. खोटी प्रतिष्ठा, स्वत:चे शूद्र स्वार्थ जपण्यासाठी पुरुष प्रधान संस्कृती स्त्रियांवर नेहमी धर्म, संस्कृती व परंपरेच्या नावाखाली दहशत निर्माण करत असते. गुलामगिरी लादत असते. स्त्रीया त्याला बळी पडतात. हा पुरुषी कावा स्त्रीयांनी ओळखला पाहिजे. स्त्रियांनी स्वत: आत्मनिर्भय बनले पाहिजे. त्यांनी भयमुक्त जीवन जगले पाहिजे. घराबाहेर पडण्याचे धाडस निर्माण केले पाहिजे. स्वत:च्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला पाहिजे.

२. स्वावलंबन, स्वाभिमान, आत्मसन्मान व आत्मविश्वास

प्रत्येक स्त्रीने स्वत: मध्ये स्वावलंबन, स्वाभिमान,

आत्मविश्वास व आत्मसन्मानाची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. जोपर्यंत स्वत: विषयीचा आत्मविश्वास व आत्मसन्मान निर्माण होत नाही, तो पर्यंत आपण गुलामच्या मानसिकतेमध्येच अडकून पडतो. गुलामीची ही मानसिकता खूप घातक असते. ती मानसिकता बदललो पाहिजे.

स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी आत्मभानाची जाणीव येणे महत्वाचे आहे. एक स्वतंत्र माणूस म्हणून आपण स्वत:ला घडविले पाहिजे. तुमची प्रतिमा एक स्त्री म्हणून उभी करणे किंवा एक माणूस म्हणून उभी करणे ही निवड स्वत:च करायची असते. तुम्ही स्वत:ला जसे व्यक्त कराल तसाच समाज तुमच्याकडे बघतो.

स्वत: कष्टाने मिळविलेल्या गोष्टींची किंमत खूप मोठी असते. त्याचवरोवर, स्वावलंबन, स्वाभिमान, आत्मसन्मान, आत्मविश्वास ही खूप मोठी व्यक्ती वैशिष्ट्ये आहेत. त्यासाठी खूप मोठी साधना लागते. अवघड ध्येय गाठण्यातच खरी कसोटी असते. या कसोटीला पात्र होण्याचा प्रयत्न कसोशीने आला पाहिजे.

३. विज्ञानवादी दृष्टीकोन

स्त्रीयांनी विज्ञानवादी दृष्टीकोन आत्मसात केला पाहिजे. आज आपल्या देशामध्ये स्त्रीया मोठया प्रमाणात अंधश्रध्देच्या आहारी गेलेल्या दिसतात. शिक्षणाचा अभाव व आत्मभानाची जाणीव नसल्यामुळे स्त्रीया अंधश्रध्देला वळी पडताना दिसतात. आपल्या सोयी स्वार्थासाठी जाणून वुजून स्त्रीयांमध्ये परंपरेच्या नावाखाली, धर्माच्या नावाखाली, संस्कृतीच्या नावाखाली अंधश्रध्दा पाळायला भाग पाडले जाते. त्यातूनच पुढे गुलामीची मानसिकता निर्माण होते, कर्तव्यापेक्षा नशिवाला महत्व निर्माण होते. अर्थातच समाज दुवळा वनायला लागतो. या चक्रातून आपली सुटका करुन घ्यायची असेल तर विज्ञानवादी दृष्टीकोन आत्मसात केला पाहिजे.

४. सकारात्मक दृष्टीकोन :-

स्वत:च्या कार्यक्षमतेविषयी सकारात्मक दृष्टीकोन बाळगला पाहिजे. मी कोणतीही गोष्ट आत्मविश्वासाने करु शकते. माझ्याकडे प्रचंड क्षमता आहे. मी सर्व गोष्टींचा सामना करु शकते. मी कोणत्याही प्रसंगाला सामोरी जाऊ शकते. मला कोणीही गुलाम बनवू शकत नाही. मी कोणाची दासी नाही, माझ्या शरीरावर पहिला अधिकारा माझा आहे. मला शिक्षण घेण्याचा, नोकरी करण्याचा, जोडीदार निवडण्याचा, स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार आहे. मी कोणावरही अवलंबून राहणार नाही. अशा प्रकारचा सकारात्मक विचार आपण सतत स्मरणात ठेवला पाहिजे. आता माझे कसे होणार, माझे नशीवच फुटके, मला तुमच्या आधाराची गरज आहे. नवऱ्याशिवाय मी जगूच शकत नाही. मी घरच सांभाळले पाहिजे. घर संसार, मु हेच माझे आयुष्य आहे. अशा नकारात्मक विचारांवर मात के पाहिजे.

५. सर्मपणशीलता

आपले जीवन काही बाबतीत समर्पणशील असले पाहि काही वेळा त्यागाची भावना असली पाहिजे, देश, समाज हा आप पेक्षा मोठा आहे. देशासाठी व समाजासाठी आंतरिक वांधिलक असली पाहिजे. निव्वळ आपल्या स्वार्थाचा विचार करणे यो नाही. स्त्रियांनी सामाजिक बांधिलकी म्हणून काही वेळ, श्रम, पै खर्च केला पाहिजे. दुसऱ्यांच्या कामी आले पाहिजे. महात्मा फु सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बावासाहे आंबेडकर यांच्यासारख्या महामानवांनी आपल्यासाठी समर्पण के म्हणून आज आपण ताठ मानेने उभे आहोत, ही समर्पनशील स्त्रियांनी जोपासली पाहिजे.

थोडक्यात, स्त्री मुक्तीचा लढा हा मानवमुक्तीचा ल आहे. जो अडीज हजार वर्षापासून चालत आलेले आहे. तथाग गौतम बुध्दांनी महिलांना आपल्या आत्मसन्मानाचा संदेश देत म्हटले आहे की, अत्त दीप भव! म्हणजे स्वयं प्रकाशित व संदेश स्त्रियांनी मनोमन अंगीकारला पाहिजे. स्त्री मुक्ती हा वि स्त्री विरुध्द पुरुष असा नसून दोघांनाही अधिक चांगला मा बनवण्याच्या दिशेने घेऊन जाणारा विचार आहे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने भारतीय महिलां मुक्तीच्या इतिहासाची पुनर्मांडणी झाली पाहिजे. आपल्या देशाम अनेक आंदोलने लढे किंवा घटना अशा घडलेल्या आहेत, ज घटना आपण महिला दिन म्हणून किंवा स्त्रिमुक्ती दिन म साजऱ्या करु शकतो.

१. महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये पहिली मुलींची श काढली. तो दिवस ही आपला महिला दिन किंवा स्त्रिमुक्ती दि म्हणून साजरा करु शकतो.

२. महात्मा फुले यांना स्त्री शिक्षणाच्या चळवळीम खांद्याला खांदा लावून सात देणाऱ्या आद्य शिक्षिका सावित्रीबा फुले यांचा जन्म दिवस आपला स्त्री मुक्तीदिन म्हणून साजरा क शकतो.

३. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांचे जन्म दि किंवा स्मृतीदिन आपला स्त्री मुक्तीदिन म्हणून साजरे करु श

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड च्या त तळयाचा सत्याग्रह केला तेंव्हा, त्यांनी प्रथम "मनुस्मृती" दहण केले. मनुस्मृती स्त्रियांना तुच्छ लेखते. स्त्रीयांना अल

Cosmos
IMPACT FACTOR
5.234

IMPACT 6.021 iijif FACTOR

Indexed

Publisher & Owner
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

ISSN-2319 9318